स्थापना ] [१-७-१९९१

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

रजिस्टर नं. बी. ओ. एम. डब्लु. डी./आर. एस. आर./सी. आर./४१५/९१-९२

## ३ रा

## वार्षिक

## अहवाल

## १९९३-९४

* कार्यालय *

१०, अतुल निवास, खेतवाडी ७ वी गल्ली,
मुंबई-४०० ००४.

: आमचे श्रध्दास्थान :



स्व. मा. रावसाहेब भाऊसाहेब वांगडे (मास्तर)

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई - ४०० ००४.

## सभा सुचना

पतपेढीच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ७/८/१९९४ रोजी दुपारी ठीक ४ वाजता १०, अतुल निवास, खेतवाडी, ७वी गल्ली, मुंबई ४०० ००४ या ठिकाणी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेकर उपस्थित राहावे ही नम्र विनंती

## सभेपुढील विषय

१) मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे

२) ३१ मार्च १९९४ अखेर संपणाऱ्या वर्षाचा वार्षिक अहवाल ताळेबंद नफा-तोटा पत्रक स्विकारणे

३) सन १९९४-९५ करीता अंतर्गत हिशेब तपासनिसांची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरवणे

४) कायदेविषयक सल्लागारांची नेमणुक करणे

५) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा-विभागणीस मान्यता देणे

६) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे अन्य विषय

संचालक मंडळाच्या आदेशावरून

मुंबई,

***श्री. भरत शिवराम पिंपळे***

दिनांक १७/७/१९९४

चिटणीस

---

### विशेष सुचना :-

१) कोणत्याही सभासदांस सुचना मांडावयाच्या असल्यास अशा लेखी सुचना दिनांक २४/७/९४ पर्यंत पतपेढीच्या कार्यालयात आणून द्याव्यात.

२) गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी वरील विषयावर विचार करण्यासाठी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल, या सभेला गणसंख्येची आवश्यकता भासणारी नाही.

३) भाग दाखले पतपेढीच्या कार्यालयात तयार आहेत, कृपया भाग खरेदीची पावती दाखवून घेऊन जावे.

४) सभासदांनी आपले कर्जाचे हप्ते प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपूर्वी भरावेत.

५) सभेस येताना सभासदांनी कृपया आपली वार्षिक अहवालाची प्रत सोबत घेऊन यावे.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई - ४०० ००४.

## (१९९१ ते १९९६)

### कार्यकारी मंडळ

संस्थापक, अध्यक्ष : श्री. ज्ञानेश्वर बापूसाहेब वांगडे (S.E.M.)

उपाध्यक्ष : श्री. रामचंद्र बळीराम वाईकर

चिटणीस : श्री. भरत शिवराम पिंपळे

खजिनदार : श्री. रामचंद्र धोंडीबा वांगडे

### संचालक

श्री. सुरेश भाऊसो पवार — श्री. बबन ज्ञानू पाटील

श्री. शंकर विश्राम आरगडे — श्री. विजय रामचंद्र शेलार

श्री. प्रकाश तुकाराम निकम — श्री. विनोद केशव पितळे

श्री. नारायण रामचंद्र सोनावणे

### अंतर्गत हिशेब तपासणीस

श्री. प्रकाश पुरुषोत्तम वांबर्डेकर (लेखापरिक्षक)

### दैनंदिन बचत एजंट

श्री. दशरथ रामचंद्र वांगडे — श्री. संजय पांडुरंग जांभळे

श्री. सुभाष तुकाराम माने — श्री. संजय दादा शेडगे

सौ. जयश्री शंकर सुर्यवंशी

### कर्मचारी

श्री. सुभाष तुकाराम माने — श्री. अशोक कृष्णा माने (बी.कॉम)

कुमारी छाया शंकर जाधव

### बँकर्स

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, पलटन रोड शाखा, मुंबई.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई - ४०० ००४.

## मनोगत

*सन्माननिय सभासद बंधु-भगिनीनो,*

आपल्या पतपेढीचा दिनांक ३१/३/१९९४ अखेर संपणाऱ्या तिसऱ्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपणासमोर सादर करताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे.

आपल्या पतसंस्थेची झपाट्याने होत असलेली प्रगती ही आपल्या सर्वांच्या सहकार्याचे प्रतिक आहे. आपल्या सर्वांच्या दृष्टीने भूषणावह बाब म्हणजे महाराष्ट्राचे सहकार मंत्री विकासरत्न माननिय अभयसिंहराजे भोसले यांचे कृपाशिर्वादाने आपल्या संस्थेस बृहन्मुंबई कार्यक्षेत्र वाढवून मिळाले आहे. त्यामुळे खेतवाडी विभागातील गरजू सभासदांबरोबरच बृहन्मुंबईतील श्रमजिवींकांच्या आर्थिक गरजा वाजवी व्याजदराने स्वबळावर भागविण्याची सोय उपलब्ध करुन देता येईल. त्याचप्रमाणे संस्थेच्या ठेवींमध्ये वाढकरण्याकरिता बृहन्मुंबई कार्यक्षेत्रात राहणाऱ्या लोकांना संस्थेच्या विविध प्रकारच्या ठेव योजनांमधे सहभागी करुन घेता येईल.

पतसंस्थेच्यावतीने सभासदांना विविध प्रकारच्या कर्जसेवा उपलब्ध करुन देणे व त्यातून तळागाळातील लोकांच्या गरजा भागवून त्यांचा विकास करणे, जीवनमान उंचावणे हे संस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न संचालक मंडळ करीत आहेत. तथापी अनेक कार्यकर्त्यांच्या तळमळीतून उभारलेल्या आपल्या पतपेढीची भरघोस प्रगती होण्याकरीता सर्वच सभासदांनी संस्थेच्या ठेवी वाढवण्यावर भर दिला पाहिजे. त्याचप्रमाणे कर्जदार सभासदांनी आपल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरुन दुसऱ्या गरजू सभासदांची गरज पूर्ण करण्याकरीता संस्थेस मदत करावी म्हणजे संस्थेस प्रगतीचे आधिकाधिक टप्पे गाठण्यास अवघड जाणार नाही. विशेषत: थकबाकीदार कर्जदारांनी आपली थकीत रक्कम संस्थेत त्वरीत भरणा करावी. जेणेकरून संस्थेला आपल्यावर वसुलीसाठी कायदेशीर कारवाई करावी लागणार नाही. कायदेशीर कारवाईचा संपूर्ण खर्च हा कर्जाच्या रक्कमेबरोबरच वसूल केला जातो. हा भूर्दंड टाळण्यासाठी आपण आपली थकबाकी कर्तव्य भावनेने संस्थेत भरावी अशी आपणांस माझी नम्र विनंती आहे.

आपला नम्र

श्री. ज्ञानेश्वर बापूसो वांगडे

संस्थापक - अध्यक्ष

दिनांक : २५/७/१९९४

मुंबई - ४००००४.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई - ४०० ००४.

***सन्माननिय सभासद बंधु-भगिनिंनो,***

आपल्या पतपेढीचा सन १९९३-९४ सालचा (३रा) वार्षिक अहवाल दिनांक ३१/३/१९९४ अखेर संपणाऱ्या वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपणासमोर सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

## संचालक मंडळ :

आपल्या संस्थेचे संचालक मंडळ ११ सदस्यांचे आहे. तिसऱ्या वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झाल्या प्रत्येक सभेस हजर राहीलेल्या सदस्यांची सरासरी ९०% पर्यंत आहे.

## भागधारक :

३१ मार्च, १९९४ रोजी पतपेढीचे एकूण भागधारक ११०८ झाले आहेत.

## भाग भांडवल :

संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ५ लाख रुपये आहे. ३१ मार्च १९९४ अखेर पतपेढीचे वसुल भाग भांडवल २,८६,४०० इतके झाले.

## सभासद कर्ज व्यवहार :

आज मिती पर्यंत संस्थेने गरजू सभासदांना वैयक्तीक जामीनावर मध्यम मुदतीची कर्जे दिली आहेत.

रुपये ८,४४,९३०/- इतके वर्षारंभी कर्ज सभासदांकडून येणे बाकी होते
रुपये १८,०१,२००/- इतके अहवाल सालात सभासदांना कर्ज देण्यात आले
रुपये १०,१३,५९१/- इतके अहवाल सालात सभासदांकडून कर्ज वसूल केले
रुपये १६,३२,५३९/- वर्ष अखेरीस सभासदांकडून कर्ज येणे बाकी

## ठेवी

संस्थेने विविध प्रकारच्या ठेवी स्विकारल्या असून ३१ मार्च अखेर शिल्लक ठेवी पुढीलप्रमाणे आहेत :-

| ठेवी | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९३-९४ |
|---|---|---|---|
| १) बचत ठेव | ५८,७०४.९७ | ६५,९३९.०१ | ७५,४५४.६१ |
| २) मुदत व दामदुप्पट | १,५९,३००.०० | ३,९६,४५०.०० | ७,०१,०००.०० |
| ३) आवर्त ठेव | १३,६९७.०० | ३६,७३०.०० | ४६,८९५.०० |
| ४) दैनंदिन ठेव | १,७४,५५५.०० | १,४६,३००.०० | ४,३९,५२०.०० |
| ५) सक्तीची बचत | २८,२४३.६३ | ७०,६९०.०८ | १,६६,१२५.७५ |

## नफा विनियोग :-

संस्थेची वसूली चांगली असून संस्थेस अहवालसालात एकुण रुपये ९२,२२३.५८ इतका नफा झाला आहे. त्यामध्ये गतवर्षीचा शिल्लक नफा ५.६४ जमा करता एकुण रुपये ९२,२२९.२२ इतका नफा विनियोगासाठी उपलब्ध राहतो संचालक मंडळाने सदरहू नफ्याचा विनियोग पुढीलप्रमाणे सुचविला आहे.

| | |
|---|---|
| राखीव निधी २५% | २३,०००.०० |
| इमारत निधी २५% | २३,०००.०० |
| बुडीत कर्ज निधी २५% | २३,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | २३,२२९.२२ |
| | ९२,२२९.२२ |

## आभार व ऋण निर्देश :-

आपली पतसंस्था प्रगतीपथावर नेण्यासाठी ज्या सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार परंतु प्रामुख्याने ज्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले त्या मान्यवरांचे आम्ही शतश: ऋणी आहोत.

**मा. अभयसिंहराजे भोसले,** सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य
**मा. शिवाजीराव देशमुख,** अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमेटी
**मा. गुलाबरावजी शेळके,** अध्यक्ष, मुंबै बँक
**एस्. एस्. कदम,** अध्यक्ष, मराठा मंदिर बँक, संचालक मुंबै बँक
**अशोकराव गजरे,** उपाध्यक्ष, मुंबै बँक
**अशोकराव शेटे,** अध्यक्ष, सातारा सहकारी बँक
**शिवाजीराव नलावडे,** संचालक, मुंबै बँक
**प्रतापराव साळुंखे,** संचालक, मुंबै बँक

**बाबुराव रामिष्टे**, सरचिटणीस, अखिल भा.माथाडी व जनरल कामगार युनियन, **दिनकर भाऊ पाटील उर्फ पोपटशेठ**, अध्यक्ष, शिवसागर सहकारी पतपेढी, **वसंतराव देशमुख**, संचालक, मुंबई सहकारी बोर्ड, **मोहनराव कदम**, संचालक, मुंबई सहकारी बोर्ड, **कटकधोंड साहेब**, जॉईंट रजिस्ट्रार, **बंगाळ साहेब**, जिल्हा उपनिबंधक, **सुधीर तुंगार**, सहनिबंधक, सहकार खाते, **वांवर्डेकर साहेब**, अंतर्गत हिशेब तपासणीस, **जगन्नाथ जाधव**, अध्यक्ष, परळी विभाग सहकारी पतपेढी, **शामराव निपाणे**, उपाध्यक्ष, परळी विभाग सहकारी पतपेढी, **सर्जेराव डांगरे**, चिटणीस, परळी विभाग सहकारी पतपेढी, **श्रीरंग आरगडे**, खजिनदार, परळी विभाग सहकारी पतपेढी, **मारुतराव शिंदे**, अध्यक्ष, कुशल को.ऑप क्रेडीट सोसायटी, **यादवराव भोसले**, उपाध्यक्ष, कुशल को-ऑप क्रेडीट सोसायटी, उरमोडी धरणग्रस्त कृती समिती, परळी विभाग शेतकरी संघ, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, **अधिकारी व कर्मचारी**, नागदेवी कामगार सभा, समर्थ सहकारी पतपेढी, सातारा सहकारी बँक अधिकारी व कर्मचारी, जनार्दन बोत्रे, सुरेश शेलार, आनंदराव गोळे, अनिल निकम, किरण जांभळे, केरेकर, किशोर साळुंखे व इतर मान्यवर बँक, पतसंस्था यांचे आम्ही आभारी आहोत.

## श्रद्धांजली

आपल्या पतसंस्थेचे आदरणीय सभासद **कै. प्रकाश किसन वाईकर** यास भावपूर्ण श्रद्धांजली तसेच संस्थेचे ज्ञात अज्ञात मृत आत्म्यांस शांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

# शिवसह्याद्री सहकारी

खेतवाडी,

## ताळेबंद पत्रक

| १९९२-९३ रु. पैसे | भांडवल व देणे | | १९९३-९४ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **भाग भांडवल** | | |
| ५,००,०००.०० | अधिकृत भाग भांडवल (प्रत्येक १० रु.चे ५०,००० भाग) | | ५,००,०००.०० |
| १,७०,२००.०० | वसूल भाग भांडवल (प्रत्येकी १०रु.चे २८६४० भाग) | | २,८६,४००.०० |
| | **राखीव व इतर निधी** | | |
| २,०७७.०० | प्रवेश शुल्क | ५९६.०० | |
| १३,०२०.०० | इमारत निधी | ६१,८४०.०० | |
| | राखीव निधी | १८,०७७.०० | |
| | बुडीत कर्ज निधी | १६,०००.०० | ९६,५१३.०० |
| | **ठेवी** | | |
| ६५,९३९.०१ | बचत ठेव | ७५४५४.६१ | |
| ७०,६९०.०८ | सक्तीची बचत ठेव | १६६१२५.७५ | |
| ३६,७३०.०० | आवर्त ठेव | ४६८९५.०० | |
| ३,९६,४५०.०० | मुदत ठेव | ७०१०००.०० | |
| १,४६,३००.०० | दैनंदिन बचत ठेव | ४३९५२०.०० | १४,२८,९९५.३६ |
| | **इतर देणी** | | |
| १,९७४.८० | आवर्त ठेव व्याज | २७५६.८० | |
| १७,४९१.१५ | मुदत ठेव व्याज | ५००७१.९५ | |
| १,४८६.१० | दैनंदिन बचत ठेव व्याज | ८१३४.५५ | |
| १,०००.०० | अंतर्गत हिशेब तपासणी फी | २५००.०० | |
| | शिक्षण निधी | ५००.०० | |
| | मुंबई सह.बोर्ड वर्गणी | ३००.०० | ६४,२६३.३० |
| | **नफा-तोटा खाते** | | |
| | मागील शिल्लक नफा | ५.६४ | |
| ६४,००५.६४ | (+) चालू वर्षाचा नफा | ९२२२३.५८ | ९२२२९.२२ |
| ९,८७,३६३.७८ | एकुण | | १९,६८,४००.८८ |

**श्री. ज्ञानेश्वर बा. वांगडे**
अध्यक्ष

**श्री. भरत शिं. पिंपळे**
चिटणीस

**श्री. रामचंद्र व. वाईकर**
उपाध्यक्ष

**श्री. रामचंद्र धों. वांगडे**
खजिनदार

# पतपेढी मर्यादित

मुंबई-४०० ००४

३१ मार्च १९९४ अखेर

| १९९२-९३<br>रु. पैसे | जिंदगी व येणें | | १९९३-९४<br>रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँकेतील शिल्लक** | | |
| १२,८७०.२७ | हातातील रोख शिल्लक | २७६१.४२ | |
| ७२,६०४.६१ | बँकेतील शिल्लक | ९९८६२.५१ | १,०२,६२३.९३ |
| | **गुंतवणुक** | | |
| १००.०० | मुंबई जि.मध्य.सह.बँक भाग | | १००.०० |
| | मुंबई जि.मध्य.सह.मुदत ठेव | | |
| | **कर्ज** | | |
| ८,५३,५२५.०० | मध्यम मुदत कर्ज | २६,४६१३०.०० | |
| | अहवाल वर्षात वसुल | (-) १०१३५९१.०० | |
| | ठेव तारण कर्ज | (+) १५२१३०.०० | १७,८४,६६९.०० |
| | **इतर येणी** | | |
| ४०,९९१.४० | कर्जावरील येणे व्याज | ७२९४८.९५ | |
| ७,२७२.५० | स्टेशनरी स्टॉक | ८०५९.०० | ८१,००७.९५ |
| ९,८७,३६३.७८ | **एकुण** | | १९,६८,४००.८८ |

माझ्या आज रोजीच्या अहवालाप्रमाणे

**श्री. प्रकाश पु. वांवर्डेकर**

(लेखा परीक्षक)

# शिवसह्याद्री सहकारी

खेतवाडी,

## नफा - तोटा पत्रक

| १९९२-९३<br>रु. पैसे | खर्च | | १९९३-९४<br>रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **ठेवीवरील व्याज** | | |
| २,४७८.९० | आवर्त ठेव | ४,३७८.६५ | |
| २०,९८६.१५ | मुदत ठेव | ४४,९४८.२० | |
| ८,३१५.६० | दैनंदिन बचत ठेव | १९,०९४.५० | |
| ३,३८८.४० | बचत ठेव | ४,४९९.७५ | |
| ५,०९६.४५ | सक्तीची बचत ठेव | ११,३३५.६७ | ८४,२५६.७७ |
| | **पगार व भत्ते** | | |
| ६,२००.०० | कर्मचारी पगार | १२,७००.०० | |
| | कर्मचारी बोनस | १,२०३.०० | १३,९०३.०० |
| | **इतर खर्च** | | |
| ३,४८४.०० | किरकोळ खर्च | ८,५६८.२५ | |
| ४४८.०० | प्रवास खर्च | १,०८५.०० | |
| १२१७७.९० | दैनंदिन बचत एजंट कमिशन | २६,८१४.०५ | |
| ६७०.०० | लॉकर भाडे | — | |
| ७,००२.८० | स्टेशनरी खर्च | १४,४५३.६५ | |
| १,६००.०० | ऑडीट फी | ३,५००.०० | |
| १०२.०० | मुंबई सह.बोर्ड वर्गणी | ३००.०० | |
| | शिक्षण निधी | ५००.०० | |
| | बँक चार्जेस | ५.०० | |
| | टपाल खर्च | १२१.२५ | ५५,३४७.२० |
| ७४,९५३.२० | नफा ताळेबंदाकडे वर्ग | | ९२,२२३.५८ |
| १,४६,९०३.४० | **एकुण** | | २,४५,७३०.५५ |

**श्री. ज्ञानेश्वर वा. वांगडे**
अध्यक्ष

**श्री. भरत शि. पिंपळे**
चिटणीस

**श्री. रामचंद्र ब. वाईकर**
उपाध्यक्ष

**श्री. रामचंद्र धों. वांगडे**
खजिनदार

# पतपेढी मर्यादित

मुंबई-४०० ००४

३१ मार्च १९९४ अखेर

| १९९२-९३<br>रु. पैसे | जमा | | १९९३-९४<br>रु. पैसे |
|---|---|---|---|
| | <u>कर्जावरील व्याज</u> | | |
| १,३८,६४८.४५ | मध्यम मुदत कर्ज व्याज | | २,३१,४१८.०० |
| | <u>गुंतवणुकीवरील व्याज</u> | | |
| ५७८.०० | मुंबई बँक चालू खाते व्याज | | ७८४.०० |
| | <u>इतर उत्पन्न</u> | | |
| ४,७०४.५० | कर्ज अर्ज फार्म विक्री | ७७५७.३० | |
| १,९१०.२५ | दंडव्याज (कर्जावरील) | ५७५९.२५ | |
| १,०६१.२० | किरकोळ जमा | - | |
| १.०० | मुंबै बँक लाभांश जमा | १२.०० | १३,५२८.५५ |
| १,४६,९०३.४० | **एकुण** | | २,४५,७३०.५५ |

माझ्या आज रोजीच्या अहवालाप्रमाणे

**श्री. प्रकाश पु. वांवर्डेकर**

(लेखा परीक्षक)

# प्रमाणित लेखा परिक्षकाचा अहवाल

शिवसह्याद्री सहकारी पतपेढी (मर्यादित) या सोसायटीचे दिनांक ३१ मार्च १९९४ रोजीचे ताळेबंद पत्रक व त्यांच दिवशी संपणाऱ्या कालावधीचे नफा-तोटा पत्रक मी तपासले असुन त्या संबंधीचा अहवाल खालील प्रमाणे देत आहे.

(१) अहवाल देण्याकरीता आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण मला मिळाले.

(२) माझ्या मते महाराष्ट्र सहकार कायदा १९६० व त्या आधीन असलेले नियम तसेच सोसायटीचे उपविधी यांना अनुसरुन सोसायटीची हिशोबी पुस्तके ठेवण्यात आली आहेत. असे माझ्या तपासणीतुन आढळले.

(३) सोसायटीचे ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक सोसायटीचे हिशोबाच्या पुस्तकांशी मिळती जुळती आहेत.

(४) मला योग्य वाटणाऱ्या माहितीनुसार व मला मिळालेल्या स्पष्टिकरणानुसार माझ्या मते सोसायटीचे संबंधीत हिशेब महाराष्ट्र सहकार कायदा १९६० व अधिनियम १९६१ नुसार आणि मला करण्यात आलेल्या खुलाशावरुन आवश्यक ती सर्व माहिती देतात.

अ) सोबत जोडलेले ताळेबंदपत्रक सोसायटीची दि.३१ मार्च १९९४ रोजीची खरी व योग्य स्थिती दर्शविते.

ब) सोबत जोडलेले नफा-तोटा पत्रक सोसायटीच्या दि.३१ मार्च १९९४ अखेर वर्षाचा खरा व योग्य नफा दर्शवितात.

दिनांक : १५-७-९४

**प्रकाश पुरुषोत्तम बांवर्डेकर**
चार्टर्ड अकाउंटंट



# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

१०, अतुल निवास, पहिला मजला, खेतवाडी ७ वी गल्ली, मुंबई–४०० ००४.

संस्था आकर्षक व्याज दराने सभासदांच्या खालील ठेवी स्वीकारते

१] दामदुप्पट ठेव योजना

२] मुदत ठेव योजना

३] आवर्त ठेव योजना

४] दैनंदिन बचत ठेव योजना

५] बचत ठेव योजना

प्रेषक :

चिटणीस,

**शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित**

१०, अतुल निवास, पहिला मजला,
खेतवाडी ७ वी गल्ली, मुंबई–४०० ००४.

छपाई : सचिन आर्ट प्रिन्टर्स, मुंबई–४०० ००४.

BOOK–POST

सभासद क्र.

प्रति,
श्री./श्रीमती ____________________

____________________

____________________